पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक २३**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ८/९/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे दृक श्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. ४६६**

क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनिस्त औंध–बाणेर, शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरुड–बावधन या क्षेत्रिय कार्यालयांच्या माहे जुलै २०२० चा कामकाजाचा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/२६१ दि.२/९/२०२० चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ४६७**

मा.रविंद्र धंगेकर यांचे दि. ३/९/२०२० चे पत्र.

देवाची उरळी, फुरसुंगी येथील २०० मे.टन क्षमतेचा मिश्र कचरा प्रक्रिया प्रकल्प, मशिनरी उभारणे व १५ वर्षाकरीता देखभाल दुरुस्ती करणे या नियोजित प्रकल्पाशी निगडीत महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२(ब) व अन्य बाबींचे मान्यतेकरीता मा.स्थायी सभा, मा.मुख्य सभा यांचेसमोर ठराव आयत्या वेळेस आणून त्यास घाईघाईत दाखल मान्य करण्याबाबतच्या हालचाली प्रशासनाकडून सुरु आहेत. सदर नियोजित प्रकल्पाची निविदा वादग्रस्त ठरलेली आहे. सदर निविदेतील देखभाल दुरुस्ती/टिपींग फी दर सीव्हीसी गाईडलाईनचे उल्लंघन करीत केवळ दाखविण्यापुरते नाममात्र पध्दतीने कमी करुन प्रशासनाने मनपाची पर्यायाने करदात्या पुणेकरांची दिशाभुल केलेली आहे. सदर प्रकल्पाकरीता मे.भुमी ग्रीन एनर्जी या ठेकेदारास मनपा ११० कोटींहून अधिक रक्कम अदा करावी लागणार आहे, ही बाब जाणीवपुर्वक मा.स्थायी समिती सादर विषयपत्रामध्ये लपविण्यात आलेली आहे. सदर नियोजित वादग्रस्त प्रकल्पास पुणे शहरातील लोकप्रतिनिधींसह देवाची उरळी, फुरसुंगी येथील ग्रामस्थांचा तीव्र विरोध आहे. सदर निविदेबाबत मा.न्यायालय, मा.स्पर्धा आयोग्य, मा.हरित लवाद यांचेकडे कायदेशीर दाद मागितल्यास सदर बाब न्यायप्रविष्ठ होऊन नियोजित कचरा प्रकल्प बंद पडण्याची दाट शक्यता आहे असे झाल्यास पुणे मनपाचे पर्यायाने करदात्या पुणेकरांचे मोठे आर्थिक नुकसान होवुन पुणे मनपाची प्रतिमा देशभरात मलीन होणार आहे.

देवाची उरळी, फुरसुंगी येथील २०० मे.टन क्षमतेचा मिश्र कचरा प्रक्रिया प्रकल्प, मशिनरी उभारणे व १५ वर्षाकरीता देखभाल दुरुस्ती करणे या वादग्रस्त प्रकल्पाशी निगडीत महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२(ब) व अन्य बाबींचे मान्यतेकरीता मा.स्थायी सभा, मा.मुख्य सभा यांचेसमोर ठराव आयत्या वेळेस आणून घाईघाईत दाखल मान्य करण्यात येवू नये. सदर वादग्रस्त कचरा प्रक्रिया प्रकल्पाचे सादरीकरण मा.मुख्य सभेत लोकप्रतिनिधींचे व देवाची उरळी, फुरसुंगी येथील कचरा डेपोत प्रकल्पाच्या जागी ग्रामस्थांचे समक्ष करण्यात येवून त्यावर साधक बाधक चर्चा करण्यात यावी.

**विषय क्र. ४६८**

मा.रविंद्र धंगेकर यांचे दि. ३/९/२०२० चे पत्र.

पुणे मनपाची हद्दवाढीनंतर साधारत: लोकसंख्या ५० लाखाच्या आसपास होत आहे. पुणे शहर हे देशातील ७ वे महानगर म्हणुन उदयास येत आहे. वाढत्या शहरीकरणामुळे संपुर्ण देशातून शिक्षण, रोजगार इ. प्रयोजनाकरीता मोठया प्रमाणावर नागरिकांचे लोंढे पुणे शहरात येत असून मुलभूत नागरी सोयीसुविधा पुरविण्यात राज्यातील आर्थिकदृष्टया दुसऱ्या व भौगलिकदृष्ट्या पहिल्या क्रमांकाची मनपा नियोजनात कमी पडत आहे. पुणे शहरातील नागरी सुविधांचा दर्जा खालविल्याने देशभरातील स्मार्ट सिटी योजना स्पर्धेतही पुणे शहराची मोठ्या प्रमाणावर पिछेहाट होत आहे.

पुणे मनपा घनकचरा व्यवस्थापन विभागाचा कारभार देशभरात कुचेष्टेचा विषय ठरीत आहे. ५० लाख पुणेकरांच्या सार्वजनिक आरोग्याशी थेट संबंध असलेल्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे घनकचरा व्यवस्थापन विषयाशी निगडीत पदवी असलेला एकही अधिकारी नाही, ही बाब दुर्दैवी आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे घनकचरा व्यवस्थापन विषयातील तज्ञ असलेला एकाही अधिकाऱ्याची नेमणुक नसणे यामागे कचरा प्रकल्पचालक ठेकेदारांचे दबावतंत्र आहे. सध्याचे घनकचरा व्यवस्थापन विभागाचे प्रमुख श्री. ज्ञानेश्वर सिताराम मोळक हे अभियांत्रिकीमधील सर्वांत प्राथमिक पदवी समजली जाणारी डिप्लोमाहोल्डर आहेत. केवळ डिप्लोमाधारक असलेल्या अधिकाऱ्यांना कोणत्याही शासकीय यंत्रणेने उपायुक्त दर्जाचे पद बहाल केलेले नसावे. पुणे मनपाकडे हजारो अभियंते कार्यरत असताना देखील सद्यस्थितीत घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे पुर्णवेळ कार्यकारी अभियंता उपलब्ध नाही. श्री. सुधीर मारुती चव्हाण यांची बदली पथ विभागात झालेली असताना त्यांचेकडे पुन्हा घनकचरा व्यवस्थापन विभागातील कार्यकारी अभियंता या पदाचा प्रभारी कार्यभार जाणीवपुर्वक देण्यात आलेला असुन नव्याने भरती झालेले बिगरअनुभवी अभियंते कनिष्ठ अभियंता या पदावर कार्यरत आहेत. घनकचरा व्यवस्थापन विभाग जाणीवपुर्वक तांत्रिकदृष्ट्या विकलांग ठेवणे या प्रकल्पचालक ठेकेदार लॉबीचा डावपेचांना मनपा प्रशासन बळी पडत आहे.

पुणे मनपा अर्थसंकल्पीय निधीतून दरवर्षी घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत शेकडो कोटी रुपये खर्च केले जातात. घनकचरा व्यवस्थापन विभागातील वरिष्ठ अधिकारी हे केवळ निविदा प्रक्रियेत तज्ञ असून त्यांना कचरा प्रक्रियेतील ज्ञानाचा अभाव असल्याने पुणे मनपास मा. हरित लवाद न्यायाधिकरण, मा. महाराष्ट्र प्रदुषण मंडळ, मा. स्पर्धा आयोग व नागरिक यांच्या रोषाला कायम सामोरे जावे लागत आहे. मे. भुमी ग्रीन एनर्जी सारख्या छोटया कंपन्या तटपुंज्या यंत्रसामुग्रीच्या सहाय्याने मोजक्या मनुष्यबळासह शेकडो कोटींचे कचरा प्रक्रिया प्रकल्प चालवित असतील तर रु. ८००० कोटी अर्थसंकल्प असलेल्या पुणे मनपास स्वत: प्रकल्प उभा करुन चालविणे सहज शक्य आहे. ही बाब वास्तवात आल्यास पुणे मनपा अर्थसंकल्पीय निधीतील कोटयावधी रुपयांची बचत होईल व मोठया प्रमाणावर आर्थिक भ्रष्टाचारास आळा बसेल.

राज्य शासनाकडुन पुणे मनपाकडे प्रतिनियुक्तीवर येणाऱ्या अधिकाऱ्यांची मोठी संख्या पाहता अनावश्यक पदे भरणे ऐवजी घनकचरा व्यवस्थापन विभागावर आयएएस दर्जाचे अधिकारी पुर्णवेळ नियुक्त करणे शहराच्या सार्वजनिक आरोग्यासाठी नितांत गरजेचे आहे. घनकचरा व्यवस्थापन विभाग संपुर्णत: मा. अतिरीक्त महापालिका आयुक्त यांचे अख्यातरीत चालविण्यात यावा.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. ४६९**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि. १/८/२०२० ते दि.१५/८/२०२० पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.४/२५५ दि.३१/८/२०२० चे पत्र.

## सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

**विषय क्र. ४७०**

देवाची उरुळी व फुरसुंगी डेपो परिसर व कॅपिंग कामाच्या परिसरातील कचऱ्यामुळे पावसाळयात निर्माण होणाऱ्या लिचेटवर प्रक्रिया करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.हिंदुस्थान इंजिनिअरिंग कॉर्पोरेशन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९९,९९,९९०/- पेक्षा ३.२५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ९६,७४,९९०=३२ (जी.एस.टी. वगळता) रकमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/२५८ दि.२/९/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ४७१**

कोविड-१९ च्या अनुषंगाने आपत्कालिन परिस्थितीसाठी पुणे महानगरपालिकेच्या लोहगाव एसआरए व हडपसर एसआरए, खराडी स्टेडियम, बालेवाडी स्टेडियम, सणस ग्राउंड व हडपसर ग्लायडिंग सेंन्टर इत्यादी ठिकाणी विलगीकरणे कक्षासाठी पंखे पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.पवन क्वीक सर्व्हीस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु. ४४,२९,३६८/- पेक्षा २१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३४,९९,२००=७२ अधिक जी.एस.टी.१२% र.रुपये ४,१९,९०४=०९ असे एकूण र.रुपये ३९,१९,१०४=८१ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांच्याशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विदयुत/२५९ दि.२/९/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ४७२**

देवाची उरुळी, फुरसुंगी डेपो येथे लॅंडफिलच्या कामकाजासाठी भाडेतत्वावर चेन बुलडोझर मशीन पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.नॅशनल अर्थमुव्हर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४९,९८,७७५/– पेक्षा १.३०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४९,३३,७९०=९२ रकमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/२६० दि.२/९/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ४७३**

स्वच्छ संस्था व विविध प्रभागांकरीता ढकलगाडे खरेदी करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.पायल इंडस्ट्रिज, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५९,९३,४५५/– पेक्षा २१.०००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४७,३४,८२९=४५ पर्यंत जीएसटी व इ.खर्चासह खरेदी करणेस व त्याकामी त्यांचे बरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/२६२ दि.२/९/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ४७४**

पुणे महानगरपालिकेमार्फत उभारण्यात आलेल्या कोविड केअर सेंटर व अलगीकरण कक्षाकरिता बेडशीट, सोलापुरी चादर, वॉशेबल ब्लॅंकेट पुरविणे कामी निविदा मागविल्या असता आलेल्या १२ निविदाधारकांपैकी निविदाधारक मे.किरण फॅब्रिक्स, इचलकरंजी यांची निविदा सर्वात कमी रकमेची असल्याने त्यांचेकडून काम करुन घेणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/भांडार/२६३ दि.२/९/२०२० चे पत्र.

१) पुणे महानगरपालिकेमार्फत उभारण्यात आलेल्या कोविड केअर सेंटर व अलगीकरण कक्षाकरिता बेडशीट, सोलापुरी चादर, वॉशेबल ब्लॅंकेट पुरविणे कामी या कामी र.रु. ४७,८०,८७५/– सर्वकरांसह पर्यंत मे.किरण फॅब्रिक्स, इचलकरंजी यांचेकडून काम करुन घेणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस तसेच सदर कामापोटी होणारे बिल अदा करणेस

२) पुणे महानगरपालिकेमार्फत उभारण्यात आलेल्या कोविड केअर सेंटर व अलगीकरण कक्षाकरिता विविध साहित्य पुरविणे कामी होणारे बिल कोव्हीड १९ करिताचे खालील नमुद अर्थशिर्षकीय संकेताकावर (बजेट हेड) वर खर्ची टाकणेस

सन २०२०–२१ RE 17 F 257

Covid – 19 अंतर्गत अत्यावशक महसुली कामांसाठी खर्च

३) पुणे महानगरपालिकेमार्फत उभारण्यात आलेल्या कोविड केअर सेंटर व अलगीकरण कक्षाकरिता विविध साहित्य पुरविणे या निविदेकामी निविदेमधील अट व शर्त क्र. ४१ नुसार निविदे संबंधित साहित्य हे तातडीने २ (दोन) दिवसाचे आत पुरवठा करावयाचे असून निविदेकरीता L-1 असणाऱ्या पुरवठादाराने निविदेसंबंधित साहित्य हे तातडीने २ (दोन) दिवसात आत लॉकडाऊन कालावधी असल्याने पुरवठा तातडीने न केल्यास सदर खरेदी तातडीने कोव्हीड केअर सेंटर करिता करावयाची असल्याने सदर साहित्य L-1 चे दरानुसार निविदेमध्ये L-2 असणाऱ्या पुरवठादाराकडून तसेच जे अन्य पुरवठादार L-1 चे दरानुसार पुरवठा करण्यास तयार असतील अशा पुरवठादारांकडून खरेदी करणेस

**विषय क्र. ४७५**

पुणे मनपाच्या पाणीपुरवठा खात्याकडील विविध जलकेंद्रासाठी पॉलीॲल्युमिनियम क्लोराईड द्रावण पुरविणे (IS 15573:2018 नुसार) (मेक–ग्रासिम/GAC/अर्किल) (बी–१ पध्दतीने) कामी टेंडर्स मागविण्यात आली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी सर्वात कमी दर देणारे निविदाधारक १) मे.एस.व्ही.एस.केमिकल कॉर्पोरेशन २) मे.संताजी आर.कदम यांचेकडून परिमाण विभाजन ७०:३० प्रमाणे खरेदी करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/पापु/२६४ दि.२/९/२०२० चे पत्र.

१) पुणे मनपाच्या विविध जलकेंद्रामध्ये पाण्याच्या निर्जंतुकीकरण प्रक्रियेसाठी साठी पॉलीॲल्युमिनियम क्लोराईड द्रावण मागणीनुसार खालील दोन पुरवठा धारकाकडून परिमाण विभाजन पॉलीॲल्युमिनियम क्लोराईड द्रावण र.रु. ३,८७,३९,०१८=२४ पर्यंत खरेदी करणेस

अ) मे.एस.व्ही.एस.यांचेकडून २३२९.६० मे.टन पॉलीॲल्युमिनियम क्लोराईड द्रावण रक्कम रु.२,७१,१७,३१२=७६ पर्यंत खरेदी करणेस व त्यानुसार करारनामा करणेस आणि त्यापोटी त्यांना बिल अदा करणेस

ब) मे.संताजी आर.कदम यांचेकडून ९९८.४० मे.टन पॉलीॲल्युमिनियम क्लोराईड द्रावण रक्कम रु.१,१६,२१,७०५=४७ पर्यंत खरेदी करणेस व त्यानुसार करारनामा करणेस आणि त्यापोटी त्यांना बिल अदा करणेस

**विषय क्र. ४७६**

लष्कर जलकेंद्रांतर्गत २२०० मि.मी. व्यासाच्या पाईप लाईनच्या अनुषंगाने विविध पाईप लाईन जोडणे विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री स्वामी गोविंद कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु.९९,९४,२३१=५२ पेक्षा १२.४०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८७,५४,९४६=८१ (स्थापत्य कामे र.रु. ७८,१६,९१६=८० + जी.एस.टी. १२% र.रु. ९,३८,०३०=०१) सर्व करांसहित काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पाणीपुरवठा/२६५ दि.२/९/२०२० चे पत्र.

**संकीर्ण**

**विषय क्र. ४७७**

आरोग्य खात्याकडे परिमंडळ(झोन) निहाय परिमंडळ आरोग्य अधिकारी(वर्ग–एक) पद निर्माण करण्यात यावे.

विकेंद्रीकरण धोरणानुसार सर्व खात्याचे विकेंद्रीकरण करण्यात आलेले आहे. यामध्ये अभियांत्रिकी विभागाचे विकेंद्रीकरणा अंतर्गत परिमंडळ(झोन)निहाय कार्यकारी अभियंता या पदांची निर्मीती करण्यात आली असल्यामुळे अभियांत्रिकी विभागाचे विकेंद्रीकरण सक्षम पध्दतीने झाल्याचे दिसून येते. परंतु आरोग्य विभागाकडे अशा पध्दतीचे विकेंद्रीकरण झाले नसल्याने आरोग्य खात्याकडील कामाचा वाढता व्याप व क्षेत्रिय कार्यालयाकडील क्षेत्रिय वैद्यकीय अधिकारी व आरोग्य अधिकारी यांच्यामध्ये असणारी दरी भरून काढण्यासाठी व कामकाजामध्ये समन्वये,कामाचे योग्य नियोजन व विभाजन होण्यासाठी परिमंडळ(झोन)निहाय पाच परिमंडळ आरोग्य अधिकारी(वर्ग–१) एम.बी.बी.एस.+क्षेत्रिय कार्यालयाकडील क्षेत्रिय वैद्यकिय अधिकारी व परिमंडळ वैद्यकिय अधिकारी या पदाचा कमीत कमी ८ ते १० वर्षाचा किंवा त्याहून अधिक प्रत्यक्ष कामाचा अनुभव असणारे पद निर्माण करणे आवश्यक आहे.

याबाबत सन २००८ मध्ये मा.स्थायी समिती सभा वार मंगळवार,दि.९/९/२००८ रोजी विषय क्र.९९६ अन्वये मा.स्थायी समिती मध्ये चर्चा झालेली असून मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्यसभेची मान्यता मिळणेबाबत झालेला महिला बाल कल्याण समिती ठ.क्र.४३ ,दि.१३/३/२००८ चा विचारासाठी ठेवलेला होता. तसेच मा.आरोग्य अधिकारी यांनी आरोग्य कार्यालय ,पुणे महानगरपालिका जावक क्र.एचओ/४४३१,दि.१६/१०/२००८ अन्वये परिमंडळ निहाय परिमंडळ आरोग्य अधिकारी(वर्ग–१) चे पद निर्माण करणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांना शिफारस केली आहे. तसेच मा.सेवक वर्ग अधिकारी पुणे म.न.पा. यांना आरोग्य कार्यालय पुणे मनपा,जा.क्र.एच.ओ./४४०२,दि.१४/१०/२००८ अन्वये कळविले आहे. परंतु गेल्या ११ वर्षमध्ये याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली दिसून येत नाही.तरी वरीलप्रमाणे पद निर्मिती करणेस मान्यता द्यावी अशी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेकडे शिफारस करणेबाबत झालेला महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र.१८,दि. १२/६/२०२० विचारासाठी.

यापूर्वी झालेला महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र.३३,दि. २४/७/२०१९ निरस्त करण्यात येत आहे.

**विषय क्र. ४७८**

शैक्षणिक वर्ष सन २०२०–२१ मध्ये नवीन माध्यमिक शाळा स्वयंसेवी संस्थाच्या मदतीने सुरु करणे आणि सुरु असलेल्या काही शाळा अन्य स्वयंसेवी संस्थाना हस्तांतरीत करणेबाबत खालील बाबीस **मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत** झालेला महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र.३५,दि. ७/८/२०२० विचारासाठी.

१ खालील तक्ता अ मध्ये नमूद केल्यानुसार संबधित शाळांमधून सन २०२०–२१ या शैक्षणिक वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित योजने अंतर्गत इ.९ वी व नैसर्गिक वाढीने पुढील वर्षी इ.१० वी चे वर्ग सुरु करणेस.

२ खालील तक्त अ मध्ये नमूद संबंधित संस्थेच्या नावासमोर दर्शविलेल्या शाळेमधून पुणे महानगरपालिका आणि आयटीच संस्था यांचे संयुक्त विद्यमाने इ.९ वी व इ.१० वी चा वर्ग सुरु करणेस

३ खालील तक्ता ब मध्ये नमूद केल्याप्रमाणे संस्था बदल करणेस व बदल केलेल्या संस्थानी स्वयंअर्थसहाय्यित योजने अंतर्गत शैक्षणिक वर्ष सन २०२०–२०२१ मध्ये इ.९ वी व इ.१० वी चा वर्ग सुरु करणेस.

**तक्ता अ (सुरु करावयाच्या नवीन माध्यमिक शाळा)**

| अ.क्र. | संस्थेच नाव | नविन शाळा | वर्ग | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १ | आयटीच संस्था | कै .केशवराव जेधे इंग्रजी माध्यमिक विद्यालय,गुरुवार पेठ | इ.९ वी व इ.१० वी | इंग्रजी |

स्वयंअर्थसहाय्यित योजने अंतर्गत संस्थेमार्फत सुरु असणाऱ्या शाळांच्या संस्थामध्ये बदल करावयाच्या माहितीचा तक्ता

**तक्ता ब (हस्तांतरीत शाळा)**

| **अ.क्र.** | **संस्थेच नाव** | **नविन शाळा** | **वर्ग** | **माध्यम** | **पूर्वीच्या संस्थेच नाव** |
|---|---|---|---|---|---|
| १ | आयटीच संस्था | पंडित दीनदयाळ उपाध्याय इंग्रजी माध्यमिक शाळा | इ.९ वी व इ.१० वी | इंग्रजी | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | श्रीविद्यापन शिक्षण प्रसारक मंडळ | १)लोकनेते यशवंतराव चव्हाण इंग्रजी माध्यमिक शाळा ,येरवडा<br>२)माता रमाबाई आंबेडकर इंग्रजी माध्यमिक शाळा चिखलवाडी<br>३)सिताराम आबाजी बिबवे इंग्रजी माध्यमिक शाळा बिबवेवाडी | इ.९ वी व इ.१० वी | इंग्रजी | श्रीशैल मल्लिकार्जुन एज्युकेशन ट्रस्ट |
| | | ४) कै .रामचंद्र(आप्पा)बनकर माध्यमिक विद्यालय हडपसर | इ.९ वी व इ.१० वी | इंग्रजी | श्री.ज्ञानसागर एजु.सोसायटी |

**विषय क्र. ४७९**

पुणे शहरामध्ये राहणाऱ्या गोर–गरीब,गरजू व दारिद्र्य रेषेखालील नागरिकांकरीता पुणे महानगरपालिकेमार्फत शहरी गरीब योजना राबविण्यात येते. सदर योजनेंतर्गत शहरातील नागरिकांना एका आर्थिक वर्षामध्ये र.रु.०१ लक्ष पर्यत आरोग्य सेवा पुरविण्यात येते.

सध्या संपूर्ण जगामध्ये कोरोना विषाणू संसर्गामुळे महामारी पसरलेली असून आपल्या राज्यात व पर्यायाने पुणे शहरात अनेक नागरिकांना या विषाणूचा संसर्ग झालेला आहे. त्यामध्ये गोर–गरिब नागरिकांची संख्या जास्त असल्याचे निदर्शनास येते आहे.

अशा परिस्थीतीत पुणे शहरातील गोर–गरीब व गरजू नागरिकांना पुणे मनपाच्या शहरी गरीब योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेता यावा म्हणून,तसेच नागरिकांची सध्याची आर्थिक परिस्थीती लक्षात घेता कोरोना विषाणूने आजारी असलेल्या व पुणे महानगरपालिकेच्या शहरी गरीब योजनेस पात्र असलेल्या नागरिकांना व त्यांच्या कुंटुंबियांना कोणताही मर्यादा न राखता सदर योजनेचा अमर्याद लाभ देण्यास तसेच कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव कमी होई पर्यत गरजू नागरिकांना सदर योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत झालेला महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र.३८,दि. १३/८/२०२० विचारासाठी.

**विषय क्र. ४८०**

पुणे मनपाच्या सन २०२०–२१ च्या अंदाजपत्रकताल शिल्लक राहणाऱ्या रकमेतून मा.माजी सभासद पुणे महानगरपालिका यांचे वैद्यकीय सहाय्य योजनेच्या बिलांच्या प्रतिपूर्तीसाठी खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे र. रु. २७,००,०००/– वर्गीकरणाने उपलब्ध करुन देण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति. महा. आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/२६६ दि.३/९/२०२० चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०–२०२१ चे अंदाजपत्रक, आरोग्य कार्यालय पुणे महानगरपालिका,<br>१) ७ रुग्णालये प्रस्तुतीगृहे औषधालये इ., RE 17D116, विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम<br>२) RE 17F194, अर्बन कम्युनिटी मेंटल हेल्थसाठी अर्थसहाय्य देणे | २२ लाख<br>५ लाख | ----<br>---- |
| नविन सुचवलेले काम<br>आरोग्य कार्यालय पुणे महानगरपालिका, ७ रुग्णालये प्रस्तुतीगृहे औषधालये, क. सेवकांसाठी आरोग्य सहाय्य योजना RE17F153E, माजी सभासद वैदयकीय सहा.योजना | ---- | २७ लाख |

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

**सुचना – कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती. व्हिडीओ कॉन्फरन्सींगची लिंक आपणास व्हॉट्सअॅप द्वारे कळविण्यात येईल.**